**शिक्षण मंडळ कार्यालय, पुणेमहानगरपलिका**
**कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना**
**निविदा क्रमांक २८**

शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका यांचेकडून खालील तपशीलात नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था,व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल,पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| **१.कोरे निविदा प्रपत्र विक्री —** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून गुरूवार दि ३०/०९/२०१० पासून शुक्रवार दिनांक १५/१०/२०१० पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल. |
| **२. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ —** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शनिवार दिनांक १६/१०/२०१० रोजी दुपारी १ वाजे पर्यंत |
| **३. निविदा उघडण्याची वेळ** | दिनांक १६/१०/२०१० रोजी दुपारी ३वा किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. |
| **४. निविदा दर** | सर्व करांसह व वाहतुकींसह देणे आवश्यक आहे. |

| अ.क. | तपशील | तरतूद | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| 1 | विदयार्थी ओळखपत्र (आयकार्ड) | 25 लक्ष | 2000/— |

**सूचना**

१. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म सोबत अटी,स्पेसिफिकेशन,निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.

२. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा मा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील.

३. सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/—** | **स्वाक्षरी/—** |
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.** | **शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.** |

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
## स्पेसिफिकेशन सन 2010 – 11

**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – 16/10/ 2010.**
**वेळ – दुपारी – 1.00 वा. पर्यंत**
**बयाना रक्कम रुपये : 25000/–**
**विदयार्थी ओळखपत्र (आयकार्ड)**

Fused Card Sticker card holder thin with sticker pasted (CARD Holder with printed lace clamp for lace) lace size 34" लांबी 12 mm रुंदी 450 ते 500 mic sticker with PVC ford

Waterproof printing, for photo digital SLR CAMERA, व्दारे फोटो काढावे लागतील. सर्व शाळेत जाऊन प्रत्येक विद्यार्थ्यांचा फोटो काढून माहिती (कार्डवरील) छापून कार्ड तयार करुन पुरवठा शाळावार करावा लागेल.

स्वाक्षरी/–
अध्यक्ष
शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.

स्वाक्षरी/–
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**शिवाजी नगर, पुणे 411005.**
**विदयार्थी ओळखपत्र**
**निविदा अटी व शर्ती 2010–11.**

1. **संदर्भ :–** पुणे दैनिक केसरी व दैनिक आज का आनंद दि. 29/09/10 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं. 28 पुणे शिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांतील सर्व माध्यमाच्या विद्यार्थ्यांकरिता **विदयार्थी ओळखपत्र** पुरविण्याचे कामी विहीत नमुन्यातील निविदा फॉर्म व निविदा खालीलप्रमाणेः –

शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिकेच्यावतीने शैक्षणिक आर्थिक वर्ष 2010–11 चे करिता खालील स्पेसिफिकेशननुसार व नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून **विदयार्थी ओळखपत्र** विशिष्ट मुदतीत पुरवठयासाठी निविदा अटी व शर्ती खालील प्रमाणे –.

**परिशिष्ठ अ**

2. **अटी व शर्ती :–**

1. निविदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निविदा आली नाही, तर ती स्विकारली जाणार नाही.

2. निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन **अ** पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

3 **अ पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निवीदा रकमेच्या शेकडा 1 टक्का या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅंकेचा मा शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (डीडी) जोडावा, 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट 12 अन्वये संबंधित लघुउद्योजकाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एसएसआय युनिट असेल, तरी सुध्दा वरील रकमा भराव्या लागतील.

**ब)** निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.आवश्यक आहे तसेच त्यामध्ये व्यवसायाच्या स्वरूपाची नोद असणे आवश्यक आहे.

**क)** आर्थिक वर्ष 2009–10 मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च 2010 अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.

**ड)** शासन, शासन अंगिकृत व इतर संस्थांना **विदयार्थी ओळखपत्र** पुरवल्याबाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

**इ)** निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (पॅन क्र) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.

**ई)** निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल, तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निविदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे

**उ)** व्यवसाय कर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक.

**ऊ)** निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करण्यासंबंधीची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे चालू वर्षाचे प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हंसी) निविदेच्या एकूण किमतीच्या किमान 25 टक्के रकमेचे.

**ए) अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीकामी सादर करावी लागतील.

4. पाकीट **ब** मध्ये निविदाधारकाने सर्व करासह दर भरावेत व दोन्ही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रं ––– नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

5. **अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास **ब** पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा. शिक्षण मंडळाचा निर्णय अतिंम राहील.

6. ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे. ( **परिशिष्ठ ब** )

अ विहीत नमुन्यातील ओळखपत्राचे दर सर्व करासह.द्यावेत.

7. **निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

**1.** निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी, **विदयार्थी ओळखपत्राचे** दर अंकी व अक्षरी लिहिलेले असावेत

2. निवीदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्णतः अगर अशंतः मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे

3. निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत, संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे

4. मान्य निविदाधारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन 7 (सात) दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करारनामा करणे बंधनकारक आहे. करारनामा करण्यास निविदादाराने असमर्थता दर्षविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम  संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

5. मान्य निवीदादारास करार करतेवेळी **विदयार्थी ओळखपत्र** पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (डीडी) ने भरावी लागेल.

6. निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष 2010—11 करिताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

7. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

8. **विदयार्थी ओळखपत्र** पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल.

9. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशनप्रमाणे **विदयार्थी ओळखपत्र** न पुरविल्यास निविदादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास **ब्लॅकलिस्ट** करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहील. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

10 करारनाम्यानुसार पुरवठा करावयाच्या **विदयार्थी ओळखपत्र** मा. शिक्षण मंडळामार्फत कळविले जाईल, त्या शाळांमध्ये सर्व करांसह स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

11. करारनाम्यानुसार व स्पेसिफिकेशननुसार विहित वेळेत व मुदतीत **विदयार्थी ओळखपत्र** न आल्यास **विदयार्थी ओळखपत्र** स्विकारल्या जाणार नाहीत. न स्विकारलेल्या **विदयार्थी ओळखपत्र** 10 (दहा) दिवसांच्या आत स्वखर्चाने संबंधित निविदादाराने त्या ठिकाणापासून स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रू. 1000/— (अक्षरी रूपये एक हजार फक्त) प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल व 30 दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर राहणार नाही.

12 पुरवठा केलेल्या सर्व **विदयार्थी ओळखपत्र** मोजून, तपासून घेऊन दिलेल्या नमुन्याप्रमाणे सर्व **विदयार्थी ओळखपत्र** असल्याची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम 194 सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

13. एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही एखाद्याला ती जर रदद् करावयाची असेल, तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील. तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

14. निविदादाराने **विदयार्थी ओळखपत्र** पुरविण्यास तयार झालेल्या आहेत त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती मा. शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

15. **विदयार्थी ओळखपत्र** पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

16 निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

17. **विदयार्थी ओळखपत्र** सांगितलेल्या ठिकाणी किंवा कार्यालयीन कोठीत पुरविल्यानंतर त्याची शिक्षण मंडळाकडून पाहणी करण्यात येईल. तसेच शासन मान्य प्रयोगशाळेकडून **विदयार्थी ओळखपत्र** विहित नमुन्यात आहेत किंवा नाहीत हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशनप्रमाणे नसलेल्या **विदयार्थी ओळखपत्र** कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

18 मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या **विदयार्थी ओळखपत्र** एकत्रित देयक मा. शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका यांचे नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शाळावार **विदयार्थी ओळखपत्र** पुरवठा करताना प्राप्त केलेली चलने संबधित शाळेच्या मा. मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

19 निविदा दिनांक 16/10/10 रोजी दुपारी 3 वाजता उघडण्यात येतील, वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनीने कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास वा त्यांचे प्रतिनिधीस हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**पुणे.**

**दिनांकः–**

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/– | स्वाक्षरी/– |
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा** |

.................................................................................................................................................................

## प्रतिज्ञालेख

मी, श्री.——————————————————————— वय —— वर्ष व्यवसाय–धंदा, राहणार ——————————————————————— निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निवीदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निवीदा भरलेली आहे व निवीदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

पुणेः–

दिनांकः–

**पुरवठाधारकाची सही व शिक्का**